
आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

वेर्णा, शनिवार, २२ फेब्रुवारी २०२५ | पान ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 170 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 22 February 2025 | Pages 4 | ₹ 4



ऑनलाइन फसवणुकीचा पर्दाफाश; ५ जणांना अटक » पान ३ वर



मुंबई इंडियन्सची नवीन जर्सी लॉंच » पान ३ वर

# पालेकरांची चौकशी, काणकोणकराना अटक

## चौकशीच्या नावाखाली सतावणूक सुरू : पालेकरांचा आरोप | ... तर न्यायालयात दाद मागणार

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २१ : पोलिस कोठडीतून पलायन केलेल्या भू-बळकाव प्रकरणातील संशयित सिद्दिकी ऊर्फ सुलेमान खानच्या पहिल्या व्हिडिओ प्रकरणी चौकशीसाठी शुक्रवारी आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अमित पालेकर यांची जुने गोवे पोलिस स्थानकात सुमारे दोन तास चौकशी करून जबानी नोंदविण्यात आली. तर दुसऱ्या प्रकरणात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या विरोधात जाहीर वक्तव्य केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रामा काणकोणकर यांना शुक्रवारी पणजी पोलिसांनी अटक केली आहे.**

सुलेमान खानच्या पहिल्या व्हिडीओप्रकरणी जुने गोवे पोलिसांनी ॲड. पालेकर यांना चौकशीसाठी गुरुवारी चौथ्यांदा समन्स बजाविले होते. त्यानुसार पालेकर यांनी सकाळी ११ वाजता जुने गोवे पोलिस स्थानकात हजेरी लावली. सुमारे दोन तास त्यांची चौकशी करून जबानी नोंदविण्यात आली. चौकशीनंतर बाहेर आल्यानंतर ॲड. पालेकर यांनी सांगितले की, चौकशीच्या नावाखाली सतावणूक सुरू आहे. मला पहिल्यांदा विचारलेलेच प्रश्न पुन्हा - पुन्हा विचारण्यात येत आहेत. कोठडीतून पलायन केलेल्या सिद्दिकीचा पहिला व्हिडिओ माझ्याकडे कसा आला हाच प्रश्न अनेकवेळा विचारला जात आहे. मात्र, व्हिडिओमध्ये सिद्दिकीने एसआयटीच्या ज्या पोलिस अधिकाऱ्यांविरोधात आरोप केले आहेत, त्यांना मात्र, चौकशीसाठी आतापर्यंत बोलविले नाहीत. ही चौकशी फक्त राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचा आरोप ॲड. पालेकर यांनी यावेळी केला.

सुलेमान खानने त्याच्या पहिल्या व्हिडिओमध्ये गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस अधीक्षक, पोलिस अधिकारी तसेच भाजपचे म्हापशाचे आमदार जोशुआ डिसोझा यांचे नाव घेतले होते. मात्र, त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप यावेळी पालेकर यांनी केला.

तसेच जर पुन्हा पोलिसांनी समन्स पाठवून चौकशीसाठी बोलविल्यास याविरोधात आपण उच्च न्यायालयात दाद मागणार आहे. तसेच या प्रकरणाची चौकशी स्वतंत्र तपास यंत्रणेकडे देण्याची मागणी करणार असल्याचे ॲड. पालेकर यांनी सांगितले.



### चौकशीसाठी बोलविल्यानंतर काणकोणकराना अटक

सामाजिक कार्यकर्ते रामा काणकोणकर यांना मुख्यमंत्र्यांविरोधात धमकीच्या स्वरूपाची विधाने केल्याच्या आरोपाखाली पणजी पोलिसांनी शुक्रवारी अटक केली. गुरुवारी पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी बोलावले होते, तर शुक्रवारी सकाळी पुन्हा हजर राहण्यास सांगून संध्याकाळी अटक करण्यात आली. एफआयआरनुसार, काणकोणकर यांच्या विधानांमुळे जनतेमध्ये द्वेष निर्माण होऊ शकतो किंवा लोकांना मुख्यमंत्र्यांविरुद्ध भडकवले जाऊ शकते, असा दावा पोलिसांनी केला आहे.

काणकोणकर यांच्या अटकेवर विरोधी पक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, राज्य सरकारवर सत्ता दडपशाहीचा आरोप केला आहे. गोवा फॉरवर्ड पार्टीचे आमदार विजय सरदेसाई यांनी टीका करत म्हटले की, ही अटक म्हणजे लोकशाहीची गळचेपी असून सत्तेचा लज्जास्पद गैरवापर आहे. सरकार असहमतीच्या आवाजांना दडपण्याचा प्रयत्न करत आहे. पोलिसांना राजकीय सूडाचे हत्यार बनवले जात आहे, मात्र आम्ही झुकणार नाही. आम आदमी पक्षाचे (आप) गोवा संयोजक अमित पालेकर यांनी काणकोणकर यांच्या अटकेला बेकायदेशीर म्हणत निषेध केला आहे. त्यांनी म्हटले, ही कारवाई म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन होत आहे. आम्ही गोवा मानवाधिकार आयोग आणि पोलिस तक्रार प्राधिकरणाला या प्रकरणाची तत्काळ दखल घेण्याचे आवाहन करतो. पर्यावरण कार्यकर्ते ॲव्हर्टिनो मिरांडा यांनी या प्रकरणावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले, लोकशाहीला मोठा धोका निर्माण झाला आहे. हा केवळ एक सामाजिक कार्यकर्त्याचा प्रश्न नाही, तर संपूर्ण राज्याच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा आहे. या प्रकरणावरून गोव्यात राजकीय वातावरण तापले असून, विरोधक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सरकारच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केला आहे.

# भारतीय निर्वासितांची ससेहोलपट सुरूच

**नवी दिल्ली, दि. २१ :** अमेरिकेतून हद्दपार करण्यात आलेल्या भारतीय नागरिकांना थेट भारतात न पाठवता पनामाला पाठवण्यात आल्याने काँग्रेसने केंद्र सरकारवर टीका केली आहे. पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर प्रश्न उपस्थित करत हे अमानवीय वागणूक असल्याचे म्हटले असून, हा निर्णय भारताच्या प्रतिष्ठेचा अपमान असल्याचे ते म्हणाले.

वेणुगोपाल यांनी शुक्रवारी एक्स वर पोस्ट करत मोदींना प्रश्न विचारला की, भारतीय नागरिकांना थेट भारतात परत पाठवण्याऐवजी पनामाला का पाठवले जात आहे? पंतप्रधान मोदींनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी कोणता करार केला आहे ? पंतप्रधान मोदी आपल्या नागरिकांना अशा अमानवीय परिस्थितीत वागवण्यास कसे परवानगी देऊ शकतात? निर्वासनाच्या या घटनेमुळे भारताचा आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा अपमान होत आहे, असे वेणुगोपाल यांनी नमूद केले.

पंतप्रधान मोदींनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी मैत्रीचे नाते असल्याचे दाखवून दिले, परंतु काही दिवसांतच भारतीय नागरिकांना सन्मानपूर्वक परत पाठवण्याऐवजी लॅटिन अमेरिकन देशांमध्ये पाठवले जात आहे. यामागील कारण स्पष्ट करण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली. पनामा, कोस्टा रिका आणि निकाराग्वा येथील भारतीय दूतावासांनी गुरुवारी एक्सवर माहिती दिली की, अमेरिकेतून हद्दपार झालेल्या भारतीय नागरिकांचा एक गट सुरक्षित पनामाला पोहोचला आहे. तथापि, पनामाला दाखल झालेल्या भारतीय नागरिकांची नेमकी संख्या जाहीर करण्यात आलेली नाही.

अमेरिकेने हद्दपार केलेल्या २९९ स्थलांतरितांच्या गटात भारतीय नागरिकांचाही समावेश होता. पनामाचे अध्यक्ष जोस राउल मुलिनो यांनी पनामा हा निर्वासितांसाठी सेतू' देश बनेल असे मान्य केल्यानंतर, गेल्या आठवड्यात तीन विमानांद्वारे हे नागरिक पनामाला दाखल झाले. भारतीय दूतावासाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, भारतीय नागरिकांना सर्व आवश्यक सुविधा असलेल्या हॉटेलमध्ये ठेवण्यात आले आहे. दूतावासाच्या पथकाला त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी कॉन्सुलर प्रवेश मिळाला आहे. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि पुनर्वसनाच्या दृष्टीने आम्ही यजमान सरकारसोबत पान २ ▶

## निवडक

### देशात ११९ चिनी ॲपवर बंदी

**नवी दिल्ली, दि. २१ :** केंद्र सरकारने चीन, हाँगकाँगमधील ११९ मोबाईल ॲपवर बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. याआधी २०२० मध्ये केंद्र सरकारने टिकटॉक या चिनी ॲपसह अन्य १०० ॲपवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. केंद्र सरकारने आक्षेपार्ह आणि वादग्रस्त मोबाईल ॲपवर कारवाई सुरू केली आहे. चीन आणि हाँगकाँगशिवाय अन्य देशांतील ॲपचाही बंदी घालण्यात आलेल्या ॲपमध्ये समावेश आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम घडवून आणणाऱ्या ॲपवर बंदी घालण्यात आली आहे. गुगल प्ले स्टोअरवरील वादग्रस्त मोबाईल ॲप हटविण्याचे आदेश केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने दिले आहेत. कलम ६९ (ए) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षेला हानी पोहोचविणाऱ्या ॲपवरही गेल्या दोन वर्षांपासून कारवाई करण्यात येत आहे. मात्र, यावेळी मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, केंद्र सरकारने कारवाईचा बडगा उगारल्यानंतर विदेशातील मोबाईल ॲप विकसित करणाऱ्या कंपन्यांनी चर्चेची तयारी दर्शविली आहे.

-------------

### सज्जनला २५ रोजी शिक्षा सुनावणार

**नवी दिल्ली, दि. २१ :** दिल्लीतील १९८४च्या शीखविरोधी दंगल प्रकरणात काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार यांच्या शिक्षेवरील निर्णय न्यायालयाने राखीव ठेवला आहे. पीडितेच्या बाजूने सज्जन कुमारला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने १ फेब्रुवारी रोजी सज्जन कुमारला दोषी ठरवले होते. १९८४च्या दंगलीदरम्यान सरस्वती विहारमध्ये जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांची हत्या केल्याबद्दल त्याला दोषी ठरवण्यात आले. तो आधीच दिल्ली कॅन्ट प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. तत्पूर्वी, दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी शुक्रवारी बचाव पक्षाला दोन दिवसांत लेखी युक्तिवाद सादर करण्याचे निर्देश दिले. ते म्हणाले की, सज्जन कुमारच्या शिक्षेबाबत आम्ही २५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ नंतर निर्णय घेऊ. १९८४च्या दंगलग्रस्तांसाठी वरिष्ठ वकील एचएस फूलका यांनी ऑनलाईन हजेरी लावली आणि त्यांचे लेखी युक्तिवाद सादर केले आणि मृत्युदंडाची मागणी केली. बचाव पक्षाच्या वतीने अनिल कुमार शर्मा हे देखील ऑनलाईन हजर झाले.

-------------

### कश्यप काश पटेल एफबीआयचे संचालक

**वॉशिंग्टन, दि. २१ :** भारतीय वंशाचे कश्यप काश पटेल हे अमेरिकन तपास संस्था फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (एफबीआय) चे संचालक बनले आहेत. अमेरिकन संसदेच्या वरिष्ठ सभागृह सिनेटने त्यांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे. शुक्रावारी झालेल्या मतदानात त्यांना ५१-४९ अशा अल्प बहुमताने या पदावर निवडून आले. डेमोक्रॅटिक पक्षाच्या खासदारांव्यतिरिक्त, दोन रिपब्लिकन खासदार सुसान कॉलिन्स आणि लिसा मुर्कोव्स्की यांनीही पटेल यांच्या विरोधात मतदान केले. विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाच्या खासदारांना भीती आहे की पदभार स्वीकारल्यानंतर काश पटेल डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशाचे पालन करतील आणि त्यांच्या विरोधकांना लक्ष्य करतील. मंजुरी मिळाल्यानंतर, पटेल यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि ॲटर्नी जनरल पाम बोंडी यांचे त्यांच्या पाठिंब्याबद्दल आभार मानले. सिनेटकडून मंजुरी मिळाल्यानंतर पटेल यांनी सोशल मीडियावर एक

### हवामान

कमाल : २७ किमान : २१
आर्द्रता : ७३

### बाजार भाव

सोने : ₹ ८८,४१० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,००,४०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५.७७ ↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# सिद्दिकी खानविरोधात तिसरे आरोपपत्र दाखल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २१ :** विशेष तपास पथक (एसआयटी) लँड ग्रॅबिंगने सुलेमान खान उर्फ सिद्दिकी याच्या विरोधात २०२२ मध्ये म्हापशात नोंदवलेल्या जमीन बळकावणीच्या प्रकरणात तिसरे आरोपपत्र दाखल केले आहे. यासह आता खानविरोधातील तीनही प्रकरणांमध्ये आरोपपत्र सादर करण्यात आले आहे. या प्रकरणात १३६४ पानांचे विस्तृत आरोपपत्र दाखल करण्यात आले असून, यात ४५ साक्षीदारांचा समावेश आहे. कायद्यानुसार, आरोपीच्या अटकेपासून ९० दिवसांच्या आत हे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२०२२ मध्ये म्हापसा पोलिस ठाण्यात अर्जुन एस. शेट्ये (दिवाणी निबंधक सह उपनिबंधक, बार्देश ) यांच्या तक्रारीवरून सुलेमान खान, अफसाना खान आणि आसिफ अल्लाबक्ष सौदागर यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींनी बनावट कागदपत्रे तयार करून ती कायदेशीर वारस म्हणून सादर केली आणि सरकारी मुद्रांक वापरून मालमत्तेच्या मालकीचे हस्तांतरण केले. त्यानंतर त्यांनी खोट्या दाव्यांद्वारे अधिकाऱ्यांची दिशाभूल करून कायदेशीर वारसांना त्यांच्या हक्कांपासून वंचित केले. हे प्रकरण पुढे विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) सोपवण्यात आले आणि तपासानंतर शुक्रवारी आरोपींविरोधात जेएमएफसी, म्हापसा न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले.

एसआयटीने यापूर्वी म्हापसा आणि वाळपई येथे नोंदवलेल्या दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये ८५२ आणि ६५६ पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. या दोन्ही प्रकरणांमध्ये खानवर बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनी बळकावल्याचा आरोप आहे. ३० जानेवारी रोजी त्याच्यावर दोन आरोपपत्र दाखल करण्यात आली होती. सुलेमान खानविरोधात १५ हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असून, त्यापैकी तीन प्रकरणे गोव्यातील जमीन बळकावण्याशी संबंधित आहेत. अटकेच्या भीतीने त्याने आपली ओळख बदलली होती आणि तो पाच वर्षे फरार होता. अखेर २०२४ मध्ये त्याला अटक करण्यात आली, मात्र गुन्हे शाखेच्या ताब्यातून तो फरार झाला. त्यानंतर पुन्हा एकदा पान २ ▶

# खनिज वाहतुकीचा तिढा कायम!

## मुळगाववासीय मागण्यांबाबत आक्रमक | उपजिल्हाधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २१ :** डिचोली मायनिंग ब्लॉक बाबत परिसरातील रहिवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी उपजिल्हाधिकाऱ्यांनी मुळगाव ग्रामस्थ आणि वेदांत कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत मायनिंग साईट आणि खाण प्रभावित क्षेत्राची संयुक्त पाहणी केली. यावेळी खाणीपासून पावसाळ्यात होणारा धोका टाळण्यासाठी येत्या १५ दिवसांत कंपनीने काम उरकून घ्यावे यावर एकमत झाले. मात्र, या काळात कंपनीला कोणत्याही प्रकारची खनिज वाहतूक करता येणार नाही ही ग्रामस्थांची अट मान्य करण्यात आली. २०११ पासूनची नुकसानभरपाई , शेतीचे नुकसान , धूळ आणि ध्वनी प्रदूषण या आणि अन्य प्रश्नांवर मुळगाववासीयांचा खनिज वाहतुकीला होणारा विरोध कायम आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून मुळगाववासीय वेदांतच्या डिचोली ब्लॉक १ मध्ये सुरू असलेल्या खनिज उत्खनन आणि वाहतुकीच्या विरोधात आक्रमक झाले आहेत. जोपर्यंत आमचे प्रश्न सुटत नाहीत तोपर्यंत कंपनीने खाण व्यवसाय बंद ठेवावा, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे. त्यानुसार ग्रामस्थांशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी उपजिल्हाधिकारी भीमनाथ खोजुर्वेकर यांनी शुक्रवारी खाण परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत ग्रामस्थ आणि कंपनीचे प्रतिनिधी होते. सर्व परिसराची पाहणी केल्यानंतर आणि ग्रामस्थ आणि कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर वेदांतने येत्या १५ दिवसांत पावसाळ्यातील संभाव्य धोका टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश उपजिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तोपर्यंत मुळगाव गावातून खनिज वाहतूक पूर्णपणे बंद राहील, असे आदेश देण्यात आले आहेत.



दरम्यान, जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मुळगाववासीयांनी आपल्या समस्यांबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली होती. मात्र, ही बैठक कोणत्याही निर्णयाविना अनिर्णित राहिली. या बैठकीत ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांच्या काही प्रमुख मागण्यांवर चर्चा झाली जसे की प्राधान्याने भातशेतीतील गाळ काढणे, २०११ पासून प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांची भरपाई करणे, डिचोली खाण ब्लॉकमध्ये जवळजवळ २.२१ लाख चौरस मीटर क्षेत्र येत असल्याने मुळगावच्या कोमुनिदादला भाडेपट्टा थकबाकी देणे वगैरे मागण्या या बैठकीत केल्या गेल्या होत्या.

मात्र कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून या मुद्द्यावर चर्चा केली जाईल असे पान २ ▶

> **पावसाळ्यापूर्वी गरजेचे असलेले काम कंपनीला करू द्यावे अशी विनंती आम्हाला उपजिल्हाधिकाऱ्यांनी केली. आम्ही त्यांना फक्त तेवढेच काम करण्यास परवानगी दिली आहे . मात्र त्याचबरोबर आमच्या तळ्यातला गाळ त्यांनी काढून द्यायचा आहे. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची खनिज वाहतूक करता येणार नाही ही आमची मागणी आहे आणि ती त्यांना मान्य आहे. आमच्या ज्या इतर मागण्या आहेत, त्यावर तोडगा काढण्यासाठी २६ तारीखनंतर पुन्हा उपजिल्हाधिकाऱ्यांनी बैठक बोलावणार असल्याचे सांगितले आहे.**
>
> **-वसंत गाड,**
> **अध्यक्ष , मुळगाव नागरिक कृती समिती.**

# अमेरिकन निधी प्रकरण ; भाजप–काँग्रेस भिडले!

**नवी दिल्ली, दि. २१ :** अमेरिकन एजन्सी ' यूएसएआयडी' ने भारतातील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी कथित निधी दिल्याच्या प्रकरणाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजवली आहे. या मुद्द्यावरून भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने चिंता व्यक्त केली असून, भाजप आणि काँग्रेसमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी सांगितले की, अमेरिकेच्या निधीविषयी आलेल्या माहितीमुळे परकीय हस्तक्षेपाबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असून, लवकरच सविस्तर माहिती दिली जाईल. याआधी भाजपने यूएसएआयडी च्या निधीला भारताच्या निवडणुकीतील परकीय हस्तक्षेप म्हणून संबोधले होते. तसेच, काँग्रेसवर हल्लाबोल करत त्यांनी या मुद्द्यावरून स्पष्टीकरण मागितले होते.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी भारताला २१ दशलक्ष डॉलर्स का द्यावे लागतात? असा प्रश्न उपस्थित केला होता. मात्र, हा निधी भारतासाठी होता की बांगलादेशसाठी, याबाबत अजूनही संभ्रम कायम आहे. इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्राने याबाबतचे वृत्त प्रकाशित करत हा निधी भारतासाठी नसून बांगलादेशसाठी होता, असा दावा केला. मात्र, या प्रकरणानंतर राजकीय वातावरण तापले असून, भाजप आणि काँग्रेस यांच्यात नवीन वाद सुरू झाला आहे.





भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी इंडियन एक्सप्रेस'च्या अहवालाचा आधार घेत काँग्रेसवर टीका केली. मालवीय यांच्या मते, २०१२ मध्ये माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्या काळात भारतीय निवडणूक आयोगाने अमेरिकेच्या इंटरनॅशनल फाउंडेशन फॉर इलेक्टोरल सिस्टीम सोबत करार केला होता. ' आयएफईएस ' ही संस्था जॉर्ज सोरोस यांच्या ओपन सोसायटी फाउंडेशन'शी संबंधित असल्याचा दावा त्यांनी केला. काँग्रेस नेते पवन खेरा यांनी भाजपवर परकीय शक्तींच्या मदतीने काँग्रेस सरकार अस्थिर करण्याचा आरोप केला. काँग्रेसचे संपर्क प्रमुख जयराम रमेश यांनी म्हटले की, इंडियन एक्सप्रेस'च्या अहवालामुळे भाजपचा खोटारडेपणा उघड झाला आहे, आणि त्यांनी माफी मागावी.

या संपूर्ण वादाचा संबंध अमेरिकेच्या डिपार्टमेंट ऑफ गव्हर्नमेंट इफिशियन्सी (डॉज ) च्या निर्णयाशी जोडला जात आहे. डॉज चे प्रमुख उद्योजक एलोन मस्क असून, यूएसएआयडी अंतर्गत देण्यात येणाऱ्या अनेक निधींची कपात करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. याच निर्णयात निवडणूक आणि राजकीय प्रक्रिया बळकटीकरण' कार्यक्रमासाठी ४८६ दशलक्ष डॉलर्सची कपात करण्यात आली. यातील २१ दशलक्ष डॉलर्स भारतासाठी होता असा दावा काही वृत्तसंस्थांनी केला होता. मात्र, यावर कोणतेही ठोस पुरावे नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणावर भारताच्या निवडणूक आयोगाने कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनी २०१०-१२ मध्ये त्यांच्या कार्यकाळात असा कोणताही निधी भारताला मिळाल्याचा इन्कार केला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानानंतर, भाजपने काँग्रेसवर आरोप करत परकीय हस्तक्षेपाचा मुद्दा उचलून धरला. मात्र, काँग्रेसने हे आरोप फेटाळून भाजपलाच प्रतिउत्तर दिले.या संपूर्ण वादामुळे भारताच्या निवडणूक प्रक्रियेवर परकीय प्रभाव असल्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अमेरिकेच्या ' यूएसएआयडी' निधी प्रकरणामुळे भारताच्या निवडणुकीवर परकीय हस्तक्षेपाचा मुद्दा गाजू लागला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत चिंता व्यक्त केली असून, भाजप आणि काँग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. पुढील काही दिवसांत या प्रकरणाची अधिकृत चौकशी झाली तरच सत्य समोर येईल.

# मडगाव न्यू मार्केट ट्रेडर्स असोसिएशनची नोंदणी रद्द

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २१ :** जिल्हा निबंधकांनी मडगाव न्यू मार्केट ट्रेडर्स असोसिएशनची नोंदणी रद्द केली आहे. असोसिएशनने खोटी माहिती दिली आणि विसंगत अहवाल सादर केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, सादर केलेल्या दस्तावेजांमध्ये मृत सदस्यांना जिवंत असल्याचे दाखविण्यात आले होते, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

या निर्णयानंतर, नवीन समिती स्थापन करण्यात आली असून तिला न्यू मार्केट ट्रेडर्स असोसिएशन असे नाव देण्यात आले आहे. समितीचे सल्लागार विनोद शिरोडकर यांनी मडगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. नव्या समितीत नवीन सदस्यांचा समावेश केला जाणार असून, न्यू मार्केटमधील व्यापाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यावर भर दिला जाणार आहे. यावेळी, दामोदर घोडे यांची अध्यक्षपदी, शोभा गावकर यांची सचिवपदी आणि संजय नाईक यांची कोषाध्यक्षपदी निवड झाल्याची माहिती देण्यात आली. समितीच्या पुढील प्रक्रियेत प्रथमनोंदणी प्रक्रियेला अंतिम रूप देण्यात येईल आणि त्यानंतर नवीन अध्यक्ष निवडण्यासाठी पुन्हा निवडणूक होईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

व्यापाऱ्यांनी बाजारपेठेतील पार्किंगच्या गंभीर समस्येवर चिंता व्यक्त केली आहे. अपुरी पार्किंग व्यवस्था असल्याने पर्यटक रस्त्यावरच वाहने उभी करतात, त्यामुळे ग्राहकांची बाजारात येण्याची संख्या घटत आहे. त्याचबरोबर, विशेषतः महिलांसाठी स्वच्छतागृहाच्या सोयींच्या अभावाबाबत व्यापाऱ्यांनी तक्रार केली आहे. तसेच, आगीच्या आपत्कालीन परिस्थितीत पाणी लवकर उपलब्ध होण्यासाठी पाण्याची टाकी बांधावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. पान २ ▶